# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक ०५/०३/२०१९

सभा सुचना क्रं. २३

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२०/०२/२०१९ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि.२०/०२/२०१९ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीसाठी.<br>अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २. | आर्थिक लेख्यांच्या नोंदी द्विनोंद लेखा पध्दतीने करणे कामाच्या निविदेस मुदतवाढ देणेबाबत. | ठराव :- उपरोक्त प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करणेत आली. आर्थिक लेख्यांच्या नोंदी, द्विनोंद लेखा पध्दतीने करणेचे काम मुदतीत पूर्ण केलेले नसल्याने प्रशासनाने मुदतवाढीसाठी व अतिरीक्त खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेला प्रस्ताव नाकारणेत येत आहे. अशी आजची स्थायी समिती सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३. | वसई आय प्रभागातील विद्युत विभागात कार्यरत ठेका दिवाबत्ती कामगारांचे वेतन अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील विद्युत विभागातील ठेका (मजुर) कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दि. १६ जानेवारी, २०१८ ते ३१ जानेवारी, २०१९ व पुढील महिन्यांचे कालवधीचे वेतन अदा करणे तसेच संबंधित ठेकेदारास अतिरिक्त दोन मजुर संवर्गातील कर्मचारी पुरवठा करणेबाबत आदेशित होणेस त्यासाठी येणाऱ्या खर्चास आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्री. वैभव पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४. | अग्निशमन विभागातील ४० मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर (T.T.L) वाहन दुरुस्तीकरीता स्पेअरपार्ट खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर टर्न ४० मीटर उंच शिडीचे वाहन विशेष हेतूने बनविले असून विदेशातील रोझनबार इंटरनॅशनल यांचेकडून खरेदी केले आहे. या वाहनासाठी लागणारे स्पेअरपार्ट भारतातील अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोल्युशन प्रा.लि.बँगलोर यांचे व्यतिरिक्त कोठेही उपलब्ध होत नसल्यामुळे लागणारे स्पेअरपार्ट हे मूळ कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून उपलब्ध करावे लागणार आहेत व त्यांनी साहित्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | दराबाबत प्रोफॉर्मा इनव्हाईस दिले आहे. प्रोफॉर्मा इन्व्हाईसमधील दराप्रमाणे टर्न टेबल लॅडर वाहनास लागणारे साहित्य रोझनबार इंटरनॅशनल कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोल्युशन प्रा.लि. यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये विना निविदा थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. २५,६३,४६९/- खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास यंत्रसामुग्री अनुषंगिक साहित्य पुरवठा करणे कामी प्राप्त दरामधील कमी दराच्या निविदाकारांनी वाटाघाटी अंती दिलेले दराचे साहित्य खरेदी करण्यास संविदा करणे व त्यामधील योग्य वाजवी दर नसलेल्या तसेच दर अप्राप्त असलेल्या घटकांची फेर निविदा मागविणेबाबत. | ठराव :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावामधील नमुद घटक क्र. ७, २०, २३, २४ व २६ या साहित्याच्या पुरवठयाचे वाटाघाटी अंती दिलेले दर निविदा समितीने मंजुरीस शिफारस दिली असल्याने व मा. आयुक्त सो. यांनी दर मंजुर केले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये ही सभा संविदा करणेस मंजुरी देत आहे. तसेच घटक क्र. २५ या घटकाचे साहित्याचे दर वाजवी नसल्याने व घटक क्र. १, २, ३, ४,५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, २२, व २७, या घटकांचे कोणतेही दर प्राप्त झाले नसल्याने व निविदा समितीची फर दर मागविणेस मंजुरीस शिफारस केली असल्याने ही सभा फेर दर मागविणेस मंजुरी दत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास वैयक्तिक सुरक्षा साहित्य पुरवठा करणे कामी प्राप्त दरामधील कमी दराच्या ई-निविदाकारांनी वाटाघाटी अंती दिलेले दराचे साहित्य खरेदी करण्यास संविदा करणे व त्यामधील योग्य व वाजवी दर नसलेल्या तसेच दर अप्राप्त असलेल्या घटकांची फेर निविदा मागविणेबाबत. | ठराव :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावामधील नमुद घटक क्र. १, २, ५, ६, ७, ११, १३ व २५ या साहित्याच्या पुरवठयाचे वाटाघाटी अंती दिलेले दर निविदा समितीने मंजुरीस शिफारस दिली असल्याने व मा.आयुक्त सो. यांनी दर मंजुर केले असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये ही सभा संविदा करणेस मंजुरी देत आहे. तसेच घटक क्र. २५ या घटकाचे साहित्याचे दर वाजवी नसल्याने व घटक क्र. ३, ९, १०, १४, १५, १६, १७ व २० या घटकांचे कोणतेही दर प्राप्त झाले नाहीत व निविदा समितीने फर दर मागविणेस मंजुरीस शिफारस असल्याने ही सभा फेर दर मागविणेस मंजुरी दत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | विरार (प.) प्रभाग क्र.३४ मध्ये कोफराड परसाव - पेढी येथील थॉमस रॉड्रीक्स यांचे घर ते अबराम नाक्या पर्यंत पाईप गटार बनविणे या | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. साईराज कन्स्ट्रक्शन हयांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कीम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त हयांनी मंजुरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर |

| | | |
|---|---|---|
| | कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | बाबींची पूर्तता करुन संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.वैभव सुदाम पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ८. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील बिलालपाडा,धानिव,पेल्हार, गावराईपाडा शिरसाड हद्दीतील दैनंदिन बाजार फी वसुली करणेकामी ठेका देणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.सन २०१९-२० | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. श्यामबली तुफानी राजभर यांची अपेक्षित देकार दरापेक्षा जास्त दराच्या ही प्राप्त निविदांमध्ये योग्य दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा. आयुक्त यांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा आयुक्त हयांचे शिफारशीनुसार मा. स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ९. | प्रभाग समिती एच मधील दिवाणमान येथील जलतरण तलावाचे व्यवस्थापन करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. गौरव एन्टरप्रायझेस यांची निविदा रक्कम रु. २,२५,०००/- दराने दर हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा. आयुक्त यांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा आयुक्त हयांचे शिफारशीनुसार संविदा करणेस सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १०. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.७६ मधील जयनगर येथे रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दरांची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. साई कन्स्ट्रक्शन यांची निविदा ७.४५% कमी ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देणेकरीता मा. आयुक्त यांनी मा. स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा आयुक्त हयांचे शिफारशीनुसार संविदा करणेस तसेच इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.वैभव सुदाम पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालय /माताबाल संगोपन केंद्र येथे मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या डॉक्टरांचे मानधन फी वाढविणेकामी निर्णय होणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालय / माताबाल संगोपन केंद्र येथे मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या डॉक्टरांचे मानधन फी वाढविणेकामी निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेची रुग्णालये / माताबाल संगोपन केंद्रे येथे सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या मानद तत्वावरील तज्ञ डॉक्टरांचे मानधन दरमहा रक्कम रु. २,५००/- एवढी वाढ करुन रु. ४,५००/- इतके वाढविणेस व भविष्यकाळात रुग्णांच्या वाढत्या संख्येनुसार वाढीव सेवा पुरविणेकामी मानद डॉक्टरांची संख्या वाढल्यास त्यापोटी येणाऱ्या अतिरिक्त वाढीव खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवरी सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती जी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथे रुग्णवाहिका करीता वाहन चालक उपलब्ध करुन देणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती जी कार्यालय अंतर्गत येणाऱ्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथील रुग्णवाहिका करीता आवश्यक ०२ वाहन चालक महानगरपालिकेच्या मंजूर ठेकेदाराकडून उपलब्ध करून रुग्णवाहिका सेवा सुरळीतपणे चालू ठेवणेस येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. किशोर ना. पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती - अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज, आगाशी, विरार (प), वटार विभागातील दैनंदिनी व आठवडे बाजार कर (शुल्क) बाजारकर लिलावाची जादा दराची ई-निविदा संविदा करारनामा मंजुर करणेबाबत. | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती -अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज, आगाशी, विरार (प), वटार विभागात दैनंदिनी बाजार वसूली कामी सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या वरील निविदेपैकी अ.क्र.३ रमाकैलास यादव यांची निविदा रक्कम ५०,४०,०००/- सर्वात जास्त आहे. तसेच १८% GST ०९,०७,२००/- असे एकुण ५९,४७,२००/- (अक्षरी एकोणसाठ लाख सत्तेचाळीस हजार दोनशे रुपये मात्र) एवढया जास्त निविदा समितीने मा. आयुक्त यांनी शिफारस केलेनुसार मंजुर निविदाधारक बरोबर संविदा करणेस तसेच १८% GST करासह व नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री.अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा कार्यक्षेत्रातील सोपारा हद्दीतीलबाजारकर सन २०१८-२१ या वित्तीय वर्षांकरीता वार्षिक ठेका पध्दतीने देणेबाबत प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या निविदा | ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मौज सोपारा येथील दैनिक बाजारकर वसूली कामी सन २०१८ ते सन २०२१ या तीन वित्तीय वर्षांकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारकांपेक्षा वालीद कासिम डबरे यांची किमान देकारापेक्षा रक्कम रु. ३१,४५,०००/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा ही निविदा समितीने स्विकारलेनुसार. सदरचा ठेका हा सन २०१८ ते २०२१ या तीन वित्तीय वर्षांकरीता मागविणेत आला असल्याने याबाबत सभेमध्ये साधक-बाधक चर्चा केली असता प्रस्तावात नमुद केलेनुसार सन २०१८ ते २०२१ या वित्तीय वर्षांकरीता प्राप्त झालेल्या जादा देकाराच्या रक्कमेवर सन २०१९- |

| | | |
|---|---|---|
| | स्विकृत करणेबाबत. | २० व सन २०२०-२१ या वर्षाकरीता प्रतीवर्षी १०% वाढ करणेस व नियमानुसार GST करासह संविदा व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार जादा रकमेच्या मंजुर निविदाधारकासोबत करारनामा करणेस व नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील मालकीच्या खेळाचे मैदानाचे भाडेवाढ करणेबाबत. | ठराव :- प्रभाग समिती आय विभागातील महानगरपालिका मालकीचे खेळाच्या मैदानाचे प्रचलित भाडे नगरपरिषदेने ठरविलेले आहे. त्यात सुधारणा होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नात आर्थिक वाढ होण्याच्या दृष्टीने नव्याने सुधारित दरवाढीच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वालीव कार्यक्षेत्रातील विभाग जुचंद्र येथे भरत असलेला दैनंदिन व आठवडा बाजार कर सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक ठेका पध्दतीने देणेबाबत प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या निविदा स्विकृत करणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील जुचंद्र येथील दैनिक बाजार व आठवडे बाजार कर वसुली कामी सन २०१९- २०२० या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या निविदाधारकांपेक्षा प्रवीण कृष्णा पाटील हयांची रक्कम रु.१८,१४,८११/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा निविदा समितीने स्वीकृत केलेनुसार सदरचा ठेका हा सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता मागविणेत आला असल्याने याबाबत सभेमध्ये साधक-बाधक चर्चा केली असता प्रस्तावात नमुद केलेनुसार सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या जादा देकाराच्या रकमेवर नियमानुसार GST व आयकर करासह तसेच महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ७३(क) नुसार मंजुर निविदाधारकांसोबत संविदा करणेस नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | कंत्राटी पध्दतीने कार्यरत वाहन चालक यांचे दि. १ मार्च २०१८ ते २० एप्रिल २०१८ या कालावधीचे वेतन आदा करणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील रुग्णालयीन ३८ ठेका कर्मचाऱ्यांना (वाहन चालक) दिनांक १ मार्च २०१८ ते २१ एप्रिल २०१८ पर्यंतचे कालावधीचे वेतन रु. १३,१०,३०८/-(अक्षरी तेरा लाख दहा हजार तीनशे आठ मात्र) अदा करणे व त्यासाठी संबंधित ठेकेदारास आदेश देणेकामी येणाऱ्या खर्चास आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १८ | प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रा अंतर्गत येणाऱ्या मार्केट/ बाजारपेठ सन २०१९-२०२० या वर्षाकरिता इ निविदा प्रक्रियने निविदा मागवून ठेका पध्दतीने बाजार कर वसुली करणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. ८ मार्केट/बाजारपेठांचा ठेका सन २०१७-१८ च्या मंजुर निविदा रक्कमेवर १०% वाढ करुन ई निविदा मागवून वसूली करणेकामी ठेका पध्दतीने सन २०१९-२०२० या कालावधीसाठी अ.क्र.१ उमेळा मार्केट, अ.क्र. २ वडवली मार्केट, अ.क्र. ८ कोळीवाडा मार्केट तसेच उर्वरित मार्केटचा सन २०१६-२०१७ च्या निविदा रक्कमेवर १०% वाढ करुन वसूली करणेसाठी ठेका पध्दतीने ई निविदा प्रक्रिया करणेस ही सभा प्रशासकीय वर्षासाठी मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील   सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १९ | व्यवसायाकरिता ना हरकत दाखला व साठा परवाना देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. चर्चेच्या अनुषंगाने प्रशासनाने दिलेला प्रस्ताव हा परिपूर्ण नाही. तरी परिपूर्ण प्रस्ताव सभागृहात सादर करावा. प्रकरणी सदरचा प्रस्ताव ही सभा तहकुब ठेवण्यास एकमताने मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. नितीन राऊत   सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २० | बिनतारी संदेश यंत्रणेची सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. महापालिकेच्या अग्निशमन विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग व पाणी पुरवठा विभागात वापरात असलेल्या बिनतारी संदेश यंत्रणेची सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या कालावधीकरीता देखभाल दुरुस्ती करण्यास तसेच आवश्यक साहित्य खरेदी करण्यास व ई-निविदा मागवून एजन्सी नियुक्त करण्यास प्रति वर्ष ३ लक्ष प्रमाणे रक्कम रुपये ९ लक्ष खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील   सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २१ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील शासन मान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयाना मदत देणेबाबत. | ठराव :- वरील विषयावर मा. स्थायी समिती सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील पुढील ग्रंथालयांना त्यांच्या वर्गवारीनुसार अनुदान रुपाने अनुदानाची प्रत्यक्ष रक्कम धनादेशाद्वारे न देता त्याच किंमतीचे आवश्यक असे ग्रंथालयासाठी लागणारे साहित्य जसे पुस्तके, कपाट, खुर्च्या, फर्निचर, संगणक, टेबल व इतर देण्यांत यावे त्यासाठी प्रत्येक ग्रंथालयातून त्यांना हवे असणाऱ्या साहित्याची यादी मागविण्यांत यावी. त्यांनी मागणी केलेले साहित्य हे वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ व २०१९-२० या वित्तीय वर्षाकरीता मंजुर असलेल्या वार्षिक निविदाधारकांना आदेश देऊन उपलब्ध करुन द्यावे, त्यासाठी आजची स्थायी समितीची सभा प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच त्याकामी होणारे त्यांचे देयक अदा करणेकामी येणाऱ्या रक्कम रुपये १५ लक्ष इतक्या खर्चास वित्तीस मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील   सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| २२ | सार्वजनिक वाचनालयास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत. प्रभाग समिती डी नवघर (पुर्व) | ठराव :- सदर विषयाचा गोषवारा प्रशासनाकडून प्राप्त न झाल्याने विषय रद्द करण्यांत यावा अशी ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २३ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णलये/ माताबाल संगोपन केंद्रे येथे रुग्णांकडून खाजगी भूलतज्ञ डॉक्टर्स यांना देंण्यात येणारी फी महानगरपालिकेकडून अदा करणेस निर्णय होणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये / माताबाल संगोपन केंद्रे येथे रुग्णांकडून खाजगी भूलतज्ञ डॉक्टर्स यांना देण्यांत येणारी फी व मानदतत्वावरील सर्जन डॉक्टर्स यांना अदा करण्यांत येणाऱ्या फीबाबत निर्णय होणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेचे रुग्णालये / माताबाल संगोपन केंद्रे येथे पूर्णवेळ मानद तत्वावर भूलतज्ञ डॉक्टर उपलब्ध होत नसल्याने खाजगी भूलतज्ञ डॉक्टर्स यांना रुग्णालये / माताबाल संगोपन केंद्र येथे आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन या डॉक्टर्सना रुग्णांकडून बधिरीकरण फी आजतागायत अदा करण्यांत येत होती. तसेच मानद तत्वावर नियुक्त करण्यांत आलेले सर्जन डॉक्टर्स यांना मा. सर्वसाधारण सभा दि. ११/०२२०१४ ठराव क्र. १८ व मा. महासभा दि. १६/०४/२०१५ ठराव क्र. २९ अन्वये निश्चित कलेली शस्त्रक्रियेची फी रुग्णांकडून व महानगरपालिकेकडून याप्रमाणे अदा करण्यांत येत होती. महानगरपालिकेची मा. सर्वसाधारण सभा दि. १७/०१/२०१९ ठराव क्र.२२ अन्वये महानगरपालिकेमार्फत कार्यक्षेत्रातील नागरिकांना देण्यांत येणाऱ्या वैद्यकीय सेवा शस्त्रक्रिया शुल्कासह विनामुल्य करण्यांत आलेल्या आहेत. तर भूलतज्ञ हे पालिकेच्या आस्थापनेवर / पॅनेलवर नसल्याने त्यांना देय असणारे बधिरीकरणाचे शुल्क हे पूर्वीप्रमाणेच रुग्णांकडून देणे अभिप्रेत आहे. ही बाब विचारात घेता सदरचा प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका